ePaper

## 1993 मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीची कोल्हापूर तुरुंगात निर्घृण हत्या



|| वर्ष - 7 | अंक - 334 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- अमेरिकेने रचला इतिहास!
- मलायका अरोराने सोडलं मौन!
- मोदींच्या कुटुंबात संपत्तीवरून कलह
- अरविंद केजरीवाल यांचं आत्मसमर्पण!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 3 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शरद पवार, ठाकरेंचा मोठा सेटबॅक, सी वोटर्सचा धक्कादायक एक्झिट पोल

# पवार, ठाकरेंकडून महायुती 'चेकमेट'!

## अजितदादांचा सुपडा साफ?



| पुणे | महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रात मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. TV9 पोलस्ट्राट एक्झिट पोलमध्ये धक्कादायक आकडेवारी दिसून आली आहे. अजित पवारांना तर खातंही खोलता येणार नसल्याचं आकडेवारीमध्ये दिसत आहे. देशातील लोकसभा निवडणुकीमधील मतदानाचे सर्व टप्पे पार पाडले असून एक्झिट पोलची आकडेवारी समोर येत आहेत. महाराष्ट्राधील दोन मोठे पक्ष ज्यामधील अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी बंड करत महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. मात्र हा निर्णय भाजपला फायद्याचा ठरलेला दिसत नाहीय.**

पोलस्ट्राटच्या एक्झिट पोलनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सुफडा साफ झाल्याचं दिसत आहे. कारण अजित पवार गटाने लढलेल्या पाच जागांपैकी एकही जागा मिळाली नसल्याचं आकडेवारी आहे. तर शिंदे यांनाही अपेक्षेपेक्षा कमी यश आलेलं दिसत आहे. पोलस्ट्राटच्या एक्झिटपोलनुसार महायुतीला २२ आणि मविआला २५ जागा मिळणार असल्याचं एक्झिट पोलमध्ये म्हटलं आहे. तर महायुतीमध्ये भाजपला सर्वाधिक १८ तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ४ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकही जागा मिळणार नसल्याचं पोलमध्ये म्हटलं आहे. तर मविआमध्ये ठाकरे गटाला सर्वाधिक १४, काँग्रेस ५ आणि शरद पवार गटाला ६ जागा मिळणार असल्याचं पोलमध्ये सांगण्यात आलं आहे.

महायुती असूनही म्हणावा असा फायदा काही झालेला दिसत नाही. एकनाथ शिंदे यांनी लढवलेल्या 15 जागांपैकी अवघ्या ४ जागा येण्याचा अंदाज पोलमध्ये वर्तवण्यात आलाय. तर राष्ट्रवादीमधून बाहेर पडत बंड करणाऱ्या अजित पवारांना जनतेने एकही जागा त्यांनी दिली नसल्याचं पोलमध्ये दिसून आलं आहे. अजित पवारांनी पाच जागा लढवल्या होत्या, यामधील एकही जागा त्यांना मिळणार नसल्याने सुफडा साफ झाला आहे. दरम्यान. एकनाथ शिंदेंच्या बंडाचा मोठा काही परिणाम झालेला दिसला नाही. कारण या पोलमध्ये दिलेल्या आकडेवारीमध्ये मविआमध्ये ठाकरे गटाने सर्वाधिक १४ जागा दाखवत आहे. त्यामुळे ठाकरेंना बंडाचा कोणताही तोटा होणार नसल्याचं दिसत आहे.



### महाराष्ट्रात वारं फिरलं

लोकशाहीचा उत्सव असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचा सातवा टप्पा पार पडला आहे. या निवडणुकांचा एक्झिट पोल समोर आला आहे. देशभरातील जनतेचे डोळे या निकालाकडे लागले आहेत. अशातच सी व्होटरने एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रातील आकडेवारी जाहीर केली आहे. या एक्झिट पोलमध्ये भाजपसाठी मोठ धक्का बसलेला दिसत आहे. महाराष्ट्रात मोठा सेटबॅक पाहायला मिळालाय, मविआ यशस्वी होत असल्याचा अंदाज एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे.

महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये अटीतटीची लढत झाल्याचं दिसत आहे. सी-व्होटरने दिलेल्या आकडेवारीमध्ये मविआला 24 आणि महयुतीला 23 जागा मिळणार असल्याचं पोलमध्ये म्हटलं आहे. यामध्ये भाजप १७ , एकनाथ शिंदे गट ६, अजित पवार गट १ जागा तर मविआमध्ये ठाकरे गट ९, काँग्रेस ८ आणि शरद पवार गट ६ जागा असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

एकंदरित सी वोटर्सच्या एक्झिट पोलनुसार अवघ्या एका जागेचा फरक दिसत आहे. जर असाच हा निकाल असेल तर भाजपसाठी धक्का मानला जात आहे. मागील निवडणुकीमध्ये शिवसेना-भाजप यांच्या 41 जागा आल्या होत्या. मात्र महायुती असूनही भाजपसाठी 24 जागा म्हणजे मविआने मोठं यश मिळवलं आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. अजित पवार आणि एकनाथ शिंदे भाजपसोबत असूनही त्यांना या एक्झिट पोलनुसार अधिक जागा येणार असल्याचा दावा महायुतीकडून करण्यात येत होता. त्यामुळे महायुतीचं यंदा महाराष्ट्रामधील 45 पार करण्याचा दावा फोल ठरताना दिसत आहे.

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १८ |
| शिवसेना | ४ |
| राष्ट्रवादी | ०० |
| काँग्रेस | ५ |
| ठाकरे गट | १४ |
| शरद पवार गट | ६ |
| इतर | १ |

*एग्झिटपोलमध्ये राज्यात भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरल्याचे दिसत आहे. भाजपला १८ जागांवर विजय मिळत असल्याचे दिसत आहे. सांगलीत अपक्ष उमेदवार विशाल पाटील विजयी होताना दिसत आहे.*

### शिंदेंना धक्का, ठाकरेंची बाजी

**राज्यातील राजकारणात दोन वर्षांत मोठे बदल झाले. शिवसेनेत फूट पडली. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० पेक्षा जास्त आमदार एकत्र आले. उद्धव ठाकरे यांना मोठा झटका बसला होता. परंतु लोकसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या गटाला फटाका बसल्याचे एग्झिट पोलमध्ये दिसत आहे. तसेच उद्धव ठाकरे यांना फायदा झाल्याचे दिसत आहे. शिवसेना शिंदे गटाला केवळ चार जागांवर समाधान मानावे लागत आहे. परंतु उद्धव ठाकरे यांना १४ जागा मिळाल्या आहेत.**

### अजित पवार यांना धक्का

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांनी वेगळी भूमिका घेत बंडखोरी केली. शरद पवार यांना धक्का देत अजित पवार यांनी महायुतीसोबत सत्ता स्थापन केली. काका-पुतण्यामधील या वर्चस्व वादात शरद पवार यांना बाप बाप होता है...हे एग्झिट पोलमध्ये दाखवून दिले आहे. या एग्झिटपोलमध्ये शरद पवार गटाला सहा जागांवर विजय मिळाला आहे. सर्वाधिक प्रतिष्ठेची ठरलेल्या बारामती येथील जागेवर शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे विजयी झाल्या आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार पराभूत होताना एग्झिट पोलमध्ये दिसत आहे.**

सी वोटर्सच्या पोलनुसार अवघ्या एका जागेने महायुतीकडे आघाडी असल्याचं दिसत आहेत.

दरम्यान, मविआच्या 23 जागांमधील सर्वाधिक जागा उद्धव ठाकरेंच्या पक्षाला सर्वाधिक ९ जागा मिळताना दिसत आहे. तर काँग्रेसला 9 आणि शरद पवार यांना 6 जागा मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला. मात्र यावरून एक स्पष्ट होत आहे की अजित पवारांचं बंड जनतेला काही रूचलेलं दिसलं नाही.

# दोन दिवसांत उष्णतेची लाट कमी होणार!

## भारतात चक्रीवादळामुळे मोसमी वारे वेगाने पुढे जात आहेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ईशान्य भारतात सुरु झालेल्या अतिवृष्टीचा परिणाम म्हणून उत्तर भारतासह महाराष्ट्रातील उष्णतेची तीव्र लाट पुढील दोन दिवसांत कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला. शनिवारी नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी बंगालचा उपसागर, अरबी समुद्र आणि ईशान्य भारतात आगेकूच केली. मात्र, केरळमध्ये हे वारे दोन दिवसांपासून अडखळले आहेत.**

नैऋत्य मोसमी वारे ईशान्य बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये आणि वायव्य बंगाल उपसागराच्या काही भागांमध्ये, त्रिपुरा, मेघालय आणि आसामच्या उर्वरित भागांमध्ये आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या बहुतांश भागांमध्ये पुढे सरकले आहेत. मोसमी वारे मध्य अरबी समुद्राच्या आणखी भागात, दक्षिण अरबी समुद्राचा उर्वरित भाग, लक्षद्वीप क्षेत्र आणि केरळ, कर्नाटकचा काही भाग, तमिळनाडूचा आणखी भाग आणि नैऋत्य बंगालच्या उपसागरात पुढील दोन-तीन दिवसांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. वायव्य, मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेची लाट सक्रीय आहे. ईशान्य भारत आणि दक्षिणेकडील भागात अति मुसळधार पाऊस सुरू राहण्याची



शक्यता आहे. त्याचा परिणाम म्हणून उष्णतेची लाट पुढील दोन दिवसांत कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ४५ ते ४८ अंशावर गेलेला तापमानाचा पारा कमी होण्यास मदत होणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने शनिवारी दिला. शनिवारी उत्तर प्रदेशातील कानपूर येथे ४८.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. ईशान्य भारतात मोसमी वाऱ्यांना अनुकूल स्थिती आहे. ईशान्य भारतात रेमल चक्रीवादळामुळे मोसमी वारे वेगाने पुढे जात आहेत. मात्र, अरबी समुद्राकडून केरळपर्यंतच्या मार्गावर या वाऱ्यांना पुढे नेणारी कोणतीच प्रणाली नसल्याने ते सध्या अडखळले आहेत.दरम्यान, राज्यात रविवारपासून पावसाची शक्यता आहे. रविवारी (२ जून) विजांच्या कडकडाटासह विखुरलेला पाऊस पडण्याची शक्यता हवामान

### मतमोजणीच्या दिवशी पावसाची शक्यता

वायव्य, मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेची लाट सक्रीय आहे. ईशान्य भारत आणि दक्षिणेकडील भागात अति मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम म्हणून उष्णतेची लाट पुढील दोन दिवसांत कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ४५ ते ४८ अंशावर गेलेला तापमानाचा पारा कमी होण्यास मदत होणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने शनिवारी दिला. शनिवारी उत्तर प्रदेशातील कानपूर येथे ४८.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

विभागाने वर्तवली आहे. ५ जूनपर्यंत पिवळा इशारा देण्यात आला आहे.लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी (४ जून) कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.नैऋत्य मोसमी वारे ईशान्य बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये आणि वायव्य बंगाल उपसागराच्या काही भागांमध्ये,हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या बहुतांश भागांमध्ये पुढे सरकले आहेत. मोसमी वारे मध्य अरबी समुद्राच्या आणखी भागात, दक्षिण अरबी समुद्राचा उर्वरित भाग, लक्षद्वीप क्षेत्र आणि केरळ, कर्नाटकचा काही भाग, तमिळनाडूचा आणखी भाग आणि नैऋत्य बंगालच्या उपसागरात पुढील दोन-तीन दिवसांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.

# कोविडच्या संशोधनाची दारे संशोधकांसाठी खुली!

## पुणे नॉलेज क्लस्टरचा वैद्यकीय विदासंच; दोन हजार रुग्णांचा समावेश

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशात संशोधकांना संशोधन करताना विदा उपलब्ध नसणे ही मोठी अडचण आहे. कोविड संकटाआधी अनेक मोठ्या साथी आल्या मात्र त्यावेळी रुग्णांच्या विदेची नोंद झाली नाही. कोविड काळात पुणे नॉलेज क्लस्टरने पुढाकार घेऊन दोन हजार रुग्णांची आरोग्यविषयक व उपचाराची माहिती संकलित केली. त्याचा विदासंच (डेटाबेस) आता संशोधकांसाठी खुला करण्यात आला आहे.**



नोबल हॉस्पिटल आणि सिम्बायोसिस युनिव्हर्सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांना सोबत घेऊन कोविड काळात रुग्णांच्या माहितीचे संकलन केले. यात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेसह एआयक्यूओडी आणि एपिक-हेल्थ इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या कंपन्यांचाही समावेश होता. एकून दोन हजार रुग्णांची आरोग्यविषयक आणि उपचाराची माहिती संकलित करण्यात आली आहे. हा विदासंच पुणे नॉलेज क्लस्टरचे संकेतस्थळ https://www.pkc.org.in/pkc-focus-area/health/covid-19-pune-clinical-database/ येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निमित्त आयोजित कार्यक्रमात पुणे नॉलेज क्लस्टरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रिया नागराज यांनी यामागील संकल्पना आणि विदासंच तयार करण्याचा प्रवास मांडला. यावेळी बोलताना बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजेश कार्यकर्ते म्हणाले की, संसर्गजन्य रोगांच्या वैद्यकीय संशोधनात या विदासंचाच्या रुपाने भारताने एक पाऊल पुढे टाकले आहे. आधीच्या मोठ्या साथींवेळी आपण हे करू शकलो नव्हतो. कोविड संकटाच्या काळात डॉक्टरांकडून लेखी स्वरूपात आपण रुग्णांची माहिती संकलित केली होती. ती नंतर डिजिटल स्वरूपात जतन करून त्याचा वापर विदासंचात करण्यात आला आहे. या विदासंचाचा आगामी काळात संशोधकांना मोठा फायदा होईल. जग हे विदेसाठी भुकेले आहे. त्यामुळे योग्य वेळी विदा जाहीर करणे गरजेचे आहे. या विदासंचाच्या आधारावर इतर आजारांसाठीही विदासंचाची निर्मिती भविष्यात

### विदा जाहीर करणे गरजेचे

आधीच्या मोठ्या साथींवेळी आपण हे करू शकलो नव्हतो. कोविड संकटाच्या काळात डॉक्टरांकडून लेखी स्वरूपात आपण रुग्णांची माहिती संकलित केली होती. ती नंतर डिजिटल स्वरूपात जतन करून त्याचा वापर विदासंचात करण्यात आला आहे. या विदासंचाचा आगामी काळात संशोधकांना मोठा फायदा होईल. जग हे विदेसाठी भुकेले आहे. त्यामुळे योग्य वेळी विदा जाहीर करणे गरजेचे आहे.

केली जाईल. त्यातून संसर्गजन्य रोगाचा प्रवास आपल्याला समजू शकतो आणि आपण अधिक चांगल्या पद्धतीने त्यावर उपाय करू शकतो, असे नोबल हॉस्पिटलचे डॉ. अमित द्रविड यांनी स्पष्ट केले.पुणे नॉलेज क्लस्टरने बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, नोबल हॉस्पिटल आणि सिम्बायोसिस युनिव्हर्सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांना सोबत घेऊन कोविड काळात रुग्णांच्या माहितीचे संकलन केले. यात राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेसह एआयक्यूओडी आणि एपिक-हेल्थ इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट या कंपन्यांचाही समावेश होता. एकून दोन हजार रुग्णांची आरोग्यविषयक आणि उपचाराची माहिती संकलित करण्यात आली आहे. हा विदासंच पुणे नॉलेज क्लस्टरचे संकेतस्थळ https://www.pkc.org.in/pkc-focus-area/health/covid-19-pune-clinical-database/ येथे उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निमित्त आयोजित कार्यक्रमात पुणे नॉलेज क्लस्टरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रिया नागराज यांनी यामागील संकल्पना आणि विदासंच तयार करण्याचा प्रवास मांडला. यावेळी बोलताना बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजेश कार्यकर्ते म्हणाले की, संसर्गजन्य रोगांच्या वैद्यकीय संशोधनात या विदासंचाच्या रुपाने भारताने एक पाऊल पुढे टाकले आहे.

## तंत्रज्ञानस्नेही उपक्रमांचा महापालिकेच्या

# करसंकलनामध्ये मोलाचा वाटा..!

### आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करसंकलनामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागामधील करसंकलनामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या विभागातील २३ कर्मचाऱ्यांचा पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक ३१ मे रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह चिंचवड येथे सत्कार करण्यात आला.**



त्यावेळी सर्वांना प्रशस्तीपत्र आणि इकिगाई या पुस्तकाची प्रत भेट देण्यात आली. यावेळी करसंकलन विभागाचे साहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख, प्रशासन अधिकारी नाना मोरे, राजाराम सरगर, चंद्रकांत विरणक, शीतल वाकडे आदी उपस्थित होते. यावेळी करसंकलन विभागाने करसंकलनासाठी घेतलेला पुढाकार व उपक्रमांचा आढावा घेण्यात आला.

करसंकलन विभागाने गतवर्षी माहिती विश्लेषण, रील स्पर्धा, सोशल मीडियातून जनजागृती आदी उपक्रम राबवून महापालिकेच्या ४२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच ९७७ कोटींचा विक्रम केला. यामध्ये योगदान देणाऱ्या 'फॉक्सबेरी टेक्नोलॉजी', 'टेक नाईन', 'स्थापत्य कन्सल्टंट ' यांना सुद्धा गौरविण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, "करसंकलन विभागाने मागील वर्षी करसंकलन करण्यासाठी अनेक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. नागरिकांपर्यंत मालमत्ताकरावरील सवलत पोहोचविण्यासाठी विशेष एसएमएसच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

माहिती विश्लेषण, विभागाची सर्व प्रक्रिया ऑनलाइन स्वरूपात करण्यात आल्याने करसंकलन विभागाला गतिमानता प्राप्त झाली असून तंत्रज्ञानस्नेही उपक्रमांचा महापालिकेच्या करसंकलनामध्ये मोलाचा वाटा आहे. महापालिकेच्या कोणत्याही विभागाला आज तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया यांचा व विभागाचे डिजिटलायजेशन आणि त्याबरोबरच प्रभावी कम्युनिकेशन यांचा वापर करणे काळाची गरज बनली आहे. करसंकलन विभागाने या सर्व प्रकारांचा अवलंब करून विक्रमी यश संपादन केले असून ही महापालिकेसाठी अभिमानाची बाब आहे. येत्या काळात विभागाची कार्यक्षमता लक्षात घेता पायाभूत सुविधेकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असून महापालिका त्यासाठी आग्रही आहे. ते पुढे म्हणाले की शासकीय यंत्रणांनी खासगी क्षेत्रातील कार्यक्षमता ओळखून त्यांना शासकीय यंत्रणांशी जोडणे व यंत्रणांचे सुसूत्रीकरण होण्यास मदत घेणे गरजेचे आहे. येत्या काळात तंत्रज्ञानामुळे सर्व सेवा नागरिकांना सुलभरीत्या पोहोचविण्यासाठी महापालिका कटिबद्ध असणार आहे. जबाबदार करदात्यांच्या संख्येत जशी वाढ होत आहे, तशी आता नागरिकांच्या सुविधांच्या अपेक्षा वाढत आहेत. त्यामुळे शहराच्या सुनियोजित विकासाला चालना देण्याचा महापालिकेचा कायम प्रयत्न राहील."

#### करभरणा केलेल्या सर्व नागरिकांचे आभार

यावेळी विभागाच्या कार्याचा आढावा घेताना सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी वर्षभरामध्ये राबविण्यात आलेल्या अभियानांची माहिती दिली. याबरोबरच विभागाचे यश हे सर्व विभागातील कर्मचारी व विभागाशी जोडल्या गेलेल्या सर्वांचे सामूहिक यश असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यावेळी त्यांनी करभरणा केलेल्या सर्व नागरिकांचे आभार मानले. यावेळी सदाशिव कोंडे यांनी सूत्रसंचालन करीत मान्यवरांचे आभार मानले.

---

## आयुक्त शेखर सिंह यांनी केली नालेसफाईच्या कामांची पाहणी

### रस्ते जलमय होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना

| पिंपरी |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई तसेच इतर सर्व कामांना गती देऊन नियोजनबद्ध पध्दतीने काम वेळेत पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले. यासाठी सातत्याने स्थळ पाहणी करुन पावसाच्या पाण्याचा त्वरीत निचरा होईल आणि रस्ते जलमय होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, तसेच ड्रेनेज व पाणी पुरवठा विभागाची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचनाही आयुक्त सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पावसाळापुर्व कामांचा आढावा घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आज आयुक्त शेखर सिंह यांनी शहरातील विविध भागातील नाल्यांची तसेच पाणी साठणाऱ्या संभाव्य ठिकाणांची पाहणी केली. तसेच पावसाळ्यामध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांच्या घरांमध्ये नाल्याचे पाणी जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी. त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य अभियंता रामदास तांबे, उप आयुक्त आण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचिता पानसरे, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, कार्यकारी अभियंता एस. टी. जावरानी, सुनील बेळगावकर, राजेंद्र शिंदे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, कंचनकुमार इंदलकर, राजेश भाट तसेच इतर संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

#### संभाव्य नुकसान टाळण्याकरीता आढावा

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने शहरात पावसामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नांचे पूर्व नियोजन करण्यात येत आहे. आरोग्य विभागामार्फत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत येणाऱ्या नाल्यांची साफसफाई करण्याचे काम पुर्णत्वावर आले आहे. अ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २५ नाले, ब क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १५ नाले, क क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २९ नाले, ड क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १२ नाले तसेच इ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १६ नाले, फ क्षेत्रीय कार्यालयातंर्गत १८ नाले, ग क्षेत्रीय कार्यालयातंर्गत ९ नाले तर ह क्षेत्रीय कार्यालयातंर्गत २० नाले असे एकूण १४४ नाले महापालिका हद्दीमध्ये आहेत. या पाहणी दौऱ्यादरम्यान मिल्कमेड बेकरी चिंचवड, आकुर्डी रुग्णालय, बजाज कंपनी समोरील सबवे, निगडी उड्डाण पुल, माता अमृतानंदमयी शाळा, राधा स्वामी सत्संग भवन, बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी उड्डाण पुल धावडे वस्तीकडील उतार, पीसीएमसी चौक, आदिनाथ नगर, आदिनाथ सोसायटीजवळील महामार्गाचा भाग येथील नाल्यांची तसेच संभाव्य पाणी साठणाऱ्या भागांची पाहणी आयुक्त शेखर सिंह यांनी केली. तसेच पूरस्थितीमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्याकरीता पालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनाचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# कितिक पिवसान बापहो?



## भूमिका

**येच्याआंदी आपून आपल्या लेखाईतून शाळेत होनारं गॅंदरींग न् चांगल्या शिक्षनासाटी प्रायव्हेट शिकवन्या म्हंजे ट्यूशन क्लासेस यातून विद्यार्थ्यांईच्या पालकाईले जो आर्थिक तरास होते त्याचा हिसोब घेतला होता.आता आपुन प्रत्यक्ष शाळेच्या शिक्षनातून बी पालक कशे काय पियल्या जातात ते पाहू!**

आपलं घोळं दुनियेच्या शर्यतीत मांगं राहू नोय म्हनून सा-याच मायबापाची मरमर असते. त्यासाटी वखद पळ्ला तं बिचारे उपाशी राहाले बी मांगं पुळं पायत नाईत. आपले उली-उली लेकरं साजरे शिस्तीत येखांदी इंग्रजीतली प्रार्थना म्हंतानी पाऊन त्याईले जन्म सफल झाल्यावानी वाट्टे.चांगलं शिक्षन याच लान लान गोठीतून दिसून पळते हे खरं हाये.पन मायबापाचा यात अक्षरशः उसासारका चेंदामेंदा करून त्याईले हुईन तितलं या शिक्षनव्यवस्थेनं पियनं लावलं. कसं?? शाळेतनी अनेक वैयक्तिक संस्थाईकून स्पर्धा घेतल्या जातात. ऑलिम्पियाडसारक्या हजारो रूपये फी उकळून चार रूपयाचं मेडल देना-या परिक्षा कायले शाळाईनं कायले पायजे? स्कॉलरशिप, नवोदय विद्यालय,अशा परिक्षा असतातच ना! अल्लग अल्लग कोर्सेस चं एंडोर्समेंट म्हंजे जाहिरातबाजी शाळेत काहाले पायजे? शाळा उन्हायात रिकामी राहू नोय म्हनून समर कॅंम्प! काईबी शिकवाचा धंदा सायाचा!शाळेतला विद्यार्थी



पुळे उद्योगधंदा करून आपल्या पायावर उभा राहाव म्हनून न्या-या न्या-या स्पर्धा घेतल्या जातात. शाळेतल्या आनंदमेल्यात खायच्या पदार्थांचे, खेळाचे, कलाकुसरीच्या वस्तूचे स्टॉल लावातंत.त्यातल्या टेबलाचं भाळं बी शाळा घेते. तीन लेकराईनं येक स्टॉल लावून त्याईनं तिनशे रूपये कमावले अस्तीन तं शंभर रूपये स्टॉलचं भाळं घेतात. मंग घ्या वाटून तिघाईत दोनशे, वा रे वा याईचं व्यवसाय मार्गदर्शन! अमक्याच दुकानातून शाळेचे कपळे,ढमक्याच दुकानातून पुस्तकं,टमक्याच दुकानातले बुटमोजे हे तं कईपासून होतंच. त्यात भर पळ्ली शाळेतच आमी स्पोर्ट्स शिकोतो म्हनून जास्तीची पाच-पाच हजार रूपये फी भरा लागते न् त्याच्या मांगं स्पोर्ट्स चे कपळे न् स्पोर्ट्स बुटं, इंस्ट्रुमेंट्स् आलेच. लेकरू शाळेत नाचात भाग घेत अशिन,काई कारेक्रम अशिन नाईतं फॅंसी ड्रेस स्पर्धा अशीन तं आमी सांगू तथूनच तुमाले भाळ्यान कपळे आना लागतीन...समजलं?? कदी पुरा युनिफॉर्म नशिन तं त्याचा दंड अल्लग,शाळेत सायकल स्टॅंडचं वर्षाचं भाळं अल्लग! शाळेतलीच कॅंटीन न् तथुल्लंच खानं पायजे.

इतलं कमी म्हनून का काय शाळेत पाचवीपासूनच क्लास घेतीन म्हंतात पुळच्या करियरसाटीचे तं मायबापाले घिऊन मिटींगले या. कायले? कारन मायबापच तं टार्गेट हायेत त्याईचे.पैसा तं आखरी त्याईच्याच खिशातून काळनं हाये कानी? हे बी ठिक हाये येक खेप. निदान हे सारं सारं लेकरायच्या भविष्याचं सपनं दाखून सुरू असते. हे सारं सारं शिकोतीन,घिऊन मांगतीन,पैसा कमावतीन पन शिक्षन घ्याले मात्र हे प्रायव्हेट टिवशनाच लावाले लावतीन. कारन शाळेत नेमका कितिक टाईम कामी आनतात त्याचा हिसोब आपुन लावूच शकतो. सनवार,दिवाई,नाताळ,उन्हायाच्या सुट्ट्या वजा करून वर्सातून चार खेपा तं अर्ध्या वर्गाले डान्स प्रॅक्टिस च्या नावाखाली न् अर्धा वर्ग डान्स प्रॅक्टिस ले गेला म्हनून बाकीच्याईले कवळीभरई शिकोत नाईत. न् त्यात का तुमचा पाल्य वर्गात 'तुमी शिकोत ना' म्हनून गैरहजर रायला तं बापाबापा शाळेले असा पुयका येते लेकराच्या भविष्याचा का पुसू नोका. काऊन्सीलर काय आन्तीन, 'तुमचं लेकरू हुशार हाये...पन' असं म्हनून कायजीच काय दाखोतीन! वर मायबापानं लेकराले टाईम देला नाई तं काय काय हू शकते म्हनून भेवाडून देनं न् मायबापानं टाईम देनं काऊन आवश्यक हाये हे समजाऊन आपली बी परेड घेतल्या जानं...मंग तुमी कित्तीकबी तीसमारखां असा!! हे सारं खरं मानून न् 'आता हेच आपली जिंदगी हाये,दुसरी शाळा येच्यावूनई खर्चिक हाये' म्हनून शाळेची आपल्या आयुष्यातली अळचन आपुन फक्त 'लेकराच्या चांगल्या भविष्यासाटी' सईन करत असतो.पन परिक्षा झाली न् पेपरं पाहाले शाळेत बलावलं का ठुलीच व्हय पालकाईपुळं चिठ्ठी. ''या या दुकानात पुळच्या वर्षीचे पुस्तकं भेटतीन.न् पुळच्या वर्षीच्या फी चा हप्ता याच मैन्यात भरा नाईतन् दाहा रूपये दरोजची लेट फी लागीन.'

## प्रासंगिक »

# नायक ते नकोसे!

***वर्तमानाच्या मानगुटीवर भूतकाळ बसला तर भविष्याची १०० शकले व्हायला वेळ लागत नाही... याला क्रिकेट तरी अपवाद कसे असेल?***

'रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारताच्या ख्यातनाम क्रिकेटपटूंसाठी उद्यापासून सुरू होत असलेली टी-२० विश्वकरंडक स्पर्धा ही भारताला जागतिक पातळीवरील जेतेपद मिळवून देण्याची अखेरची संधी आहे.' गेल्या दोन दिवसांपासून क्रिकेट वर्तुळातील सगळी चर्चा याच बातमीभोवती फिरते आहे. आता खरे तर भारतीय संघात हे दोघे सोडून इतरही खेळाडू आहेतच की. आणि, क्रिकेट हा सांघिक खेळ असल्याने केवळ हे दोघेच संघाला जिंकून देऊ शकतील, असे म्हणण्यात काय अर्थ? पण भारतीयांना कोणत्याही क्षेत्रात नायक लागतात. त्या नायकावर आपण कळत-नकळत आपल्या आकांक्षा पूर्ण करण्याचे ओझे टाकतो. उदाहरणार्थ, क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर खेळला तरच भारत जिंकेल, असे काही दशकांपूर्वी आपण ठरवूनच टाकले होते. तेंडुलकर बाद झाला की टीव्ही बंद वगैरे.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांच्या (आयएलओ) इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार, रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणातही नसलेल्या तरुणांचे प्रमाण भारतात २०१० पासून २०१९ पर्यंतच्या काळात श्रमबळाच्या सुमारे २९.२ पर्यंत वाढलेले होते. महिला श्रमिकांची स्थिती त्याहून वाईट आहे.

# बेरोजगारीचा चढता आलेख चिंताजनक!

देशात सर्वात मोठी निराशा बेरोजगारीच्या प्रश्नावर आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनांच्या (आयएलओ) इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४ नुसार भारतात श्रम करणाऱ्यांचे लोकसंख्येमधील प्रमाण २०११ मध्ये ५९ होते आणि २०२१ मध्ये ते ६३ झाले. पुढील सुमारे १५ वर्षे हे प्रमाण असेच राहणार आहे असा अंदाज आहे. उत्पादनवाढीसाठी नवे स्वयंचलित तंत्रज्ञान वापरले जात असल्याने उत्पादन (म्हणजे राष्ट्रीय स्थूल उत्पन्न) वाढते, परंतु त्या प्रमाणात रोजगार वाढत नाही आहे. जे राजकीय पक्ष बेरोजगारीबद्दल विविध प्रकारची अशक्यप्राय आश्वासने देतील त्यांना जनतेनेच विचारावयास हवे की हे कसे शक्य होणार हे सांगा. या बेरोजगारीमुळेच (साहजिकच) प्रत्येक समाजगट म्हणतो की आम्हाला आमच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण द्या. रोजगार नसल्यामुळे हिंसा, लैंगिक गुन्हे, सामान्य गुन्हेगारी वाढत आहे हे लक्षात



घेणे आवश्यक आहे. विकासकामांतील बराचसा रोजगार कंत्राटी असतो, तो अनिश्चिततेची तलवार टांगती ठेवतो. २०२४ च्या निवडणुकीत हा मुद्दा त्या तीव्रतेने चर्चेत आला नाही. आजकाल अनेक छोट्या कारखान्याबाहेर आणि आसपास 'हेल्पर पाहिजे', 'टर्नर पाहिजे', ऑपरेटर पाहिजे' असे फलक दिसतात. हे फलक पाहून अल्पशिक्षित, अननुभवी कामगार तेथे कामावर हजर होतात. पण बहुतेक वेळा एक-दोन दिवसांतच, 'मिळत असलेले काम आवडीचे नाही, अपेक्षित पगार अथवा वाढ नाही, काम शारीरिक कष्टाचे आहे, संस्था प्रतिष्ठित नाही, कामाच्या ठिकाणाचे वातावरण चांगले नाही, एम्प्लॉयरच्या अपेक्षा फार आहेत, अधिक वेळ काम करावे लागते, सुट्ट्या कमी, कामाच्या वेळा सोयीच्या नाहीत, घरापासून लांब आहे' अशी कारणे पुढे करून तो कामगार नोकरी सोडून देताना आढळतो. आलेली संधी जर ही मुले नाकारत असतील तर त्यांना बेरोजगार का म्हणायचे हा खरा प्रश्न पडतो. याउलट अपवादात्मक एखादा खरा गरजू कामगार-कर्मचारी कामावरून सुटल्यावर झोमॅटोच्या डिलिव्हरीज करून आणखी दीड-दोनशे रूपये पदरात पाडून घेताना आढळतो. कोणतेही काम कमी प्रतीचे समजू नका, असे सांगितले जाते. गाडगे महाराजांनी रस्ते झाडले, मंदिरे साफ केली अशी उदाहरणे दिली जातात. अशा लोकांच्या प्रतिमा घरात लावून त्यांची पूजा केली जाते, पण त्यांचे अनुकरण करण्याची मात्र आम्हाला लाज वाटते. भारतीय मुले शिकायला अमेरिकेत गेल्यावर आपल्याकडे कमी प्रतीची समजली जाणारी कामे सहजगत्या करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उद्धव ठाकरे सरकारमध्ये असतील!

## आमदार रवी राणांचा उद्धव ठाकरेंबाबत मोठा दावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात लोकसभा निवडणुका पार पडल्या आहेत. आता ४ जून रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्याआधी १ जून रोजी एक्झिट पोलचा अंदाज समोर आला आहे. या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, देशात पुन्हा एकदा एनडीएचं सरकार येणार असल्याची शक्यता आहे. भाजपाप्रणित एनडीएने ३५० चा आकडा पार केल्याचं एक्झिट पोलच्या आकडेवारीत दिसत आहे. तर दुसरीकडे विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी देशात इंडिया आघाडीचं सरकार येणार असल्याचा दावा केला आहे. अशातच अपक्ष आमदार रवी राणा यांनी मोठं विधान केलं आहे. 'देशात पुन्हा एकदा नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर १५ दिवसांत उद्धव ठाकरे त्यांच्याबरोबर दिसतील', असं वक्तव्य रवी राणा यांनी केलं. ते टिव्ही ९ मराठीशी बोलत होते.**



मी आपल्याला सांगतो की, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलले आहेत. मात्र, आता मी जबाबदारीने सांगतो की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान म्हणून विराजमान झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे मोदी सरकारमध्ये असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर ते दिसतील. कारण येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा आहे. देशाचं भविष्य उज्वल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरज आहे", असं रवी राणा यांनी म्हटलं आहे.आमदार रवी राणा यांनी मोदी सत्तेत आल्यानंतर उद्धव ठाकरे १५ दिवसांत त्यांच्याबरोबर येतील, असा मोठा दावा केला. त्यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी भाष्य केलं आहे. शिरसाट म्हणाले, "या गोष्टी जर तरच्या आहेत. त्यांनी (उद्धव ठाकरे यांनी) यावं की नाही, हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. तसंच त्यांना घ्यावं की नाही हे ठरवणारे उद्धव ठाकरे नाही तर ते नरेंद्र मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे आहेत", अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.यावेळी संजय शिरसाट यांना पडद्यामागे काही हालचाली सुरु आहेत का?, असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले,"आता पडद्यामागे हालचाली नाही तर आता पडदा बाजूला गेलेला आहे. आता हालचाली या समोर व्हायला लागल्या आहेत. हे सर्वसामान्य माणसांनाही माहिती आहे. त्यांचे (उद्धव ठाकरे यांचे) प्रयत्न सुरू आहेत. त्यांना महाविकास आघाडीमध्ये राहायचं नाही हे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे उद्या ते आले तर आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नाही", असं सूचक विधान संजय शिरसाट यांनीही यावेळी केलं.मी आपल्याला सांगतो की, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलले आहेत. मात्र, आता मी जबाबदारीने सांगतो की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान म्हणून विराजमान झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे मोदी सरकारमध्ये असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर ते दिसतील. कारण येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा आहे. देशाचं भविष्य उज्वल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरज आहे", असं रवी राणा यांनी म्हटलं आहे.आमदार रवी राणा यांनी मोदी सत्तेत आल्यानंतर उद्धव ठाकरे १५ दिवसांत त्यांच्याबरोबर येतील, असा मोठा दावा केला. त्यावर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी भाष्य केलं आहे. शिरसाट म्हणाले, "या गोष्टी जर तरच्या आहेत. त्यांनी (उद्धव ठाकरे यांनी) यावं की नाही, हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे. तसंच त्यांना घ्यावं की नाही हे ठरवणारे उद्धव ठाकरे नाही तर ते नरेंद्र मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे आहेत", अशी प्रतिक्रिया संजय शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.यावेळी संजय शिरसाट यांना पडद्यामागे काही हालचाली सुरु आहेत का?, असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले,"आता पडद्यामागे हालचाली नाही तर आता पडदा बाजूला गेलेला आहे. आता हालचाली या समोर व्हायला लागल्या आहेत. हे सर्वसामान्य माणसांनाही माहिती आहे. त्यांचे (उद्धव ठाकरे यांचे) प्रयत्न सुरू आहेत. त्यांना महाविकास आघाडीमध्ये राहायचं नाही हे जवळपास निश्चित आहे. त्यामुळे उद्या ते आले तर आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नाही", असं सूचक विधान संजय शिरसाट यांनीही यावेळी केलं.

### येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा

मी आपल्याला सांगतो की, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत ज्या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बोलले आहेत. मात्र, आता मी जबाबदारीने सांगतो की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान म्हणून विराजमान झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे मोदी सरकारमध्ये असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर ते दिसतील. कारण येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा आहे. देशाचं भविष्य उज्वल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरज आहे.

# भाजपाला फोडाफोडीच्या राजकारणाचा फटका!

## पक्षप्रवेशाची इच्छा व्यक्त करणाऱ्या खडसेंच्या भाजपालाच कानपिचक्या

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशभरात लोकसभा निवडणुकीसाठी सर्व सात टप्प्यांचं मतदान शनिवारी पूर्ण झालं. त्यापाठोपाठ आलेल्या एक्झिट पोल्समध्ये प्रामुख्याने एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल असे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. खुद्द मोदीपासून भाजपाच्या सर्व नेत्यांनी ४०० पारचा दिलेला नारा जरी प्रत्यक्षात उतरताना दिसत नसला तरी सत्तास्थापनेचं बहुमत भाजपाकडे असेल, असे कल एक्झिट पोलमधून समोर आले आहेत.**

पण दुसरीकडे महाराष्ट्रात भाजपाप्रणीत महायुतीला मोठा फटका बसण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यावरून राज्यात दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत.भारतीय जनता पक्षाचे नेते चंद्रकांत पाटील, यांनी महाराष्ट्रासंदर्भात एक्झिट पोलचे हे आकडे चुकणार असून ४ जूनला महायुतीलाच जास्त जागा मिळणार असल्याचा दावा केला आहे. पण त्याचवेळी निवडणुकांपूर्वी भाजपामध्ये प्रवेशाचा मानस उघडपणे बोलून दाखवणारे एकनाथ खडसे यांनी भाजपालाच कानपिचक्या दिल्या आहेत. भाजपाला राज्यात फोडाफोडीच्या राजकारणाचा फटका बसल्याचं विधान एकनाथ खडसेंनी केलं आहे.भाजपाला फोडाफोडीच्या राजकारणाचा फटका बसला




आहे का? अशी विचारणा केली असता एकनाथ खडसेंनी त्यावर होकारार्थी प्रतिक्रिया दिली. "नक्कीच. महाराष्ट्रात जे फोडाफोडीचं राजकारण झालंय, त्याचा फटका भाजपाला बसताना दिसतोय. राज्यभरात फोडाफोडीचं राजकारण मतदारांनी अमान्य केलं आहे. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेतला. उद्धव ठाकरेंचा पक्ष एकनाथ शिंदेंकडे गेला. मूळ पक्ष ज्यांचा आहे, ज्यांनी रात्रंदिवस परिश्रम करून हे पक्ष उभे केले, त्यांच्या हातून ते इतरांच्या हातात जाणं या फोडाफोडीच्या राजकारणाचा हा परिणाम आहे", असं एकनाथ खडसे म्हणाले.या प्रकारांमुळेच अजित पवारांना या निवडणुकीत फारसा प्रतिसाद दिसत नाहीये. एकनाथ शिंदेंनाही फारसा प्रतिसाद दिसत नाहीये. उद्धव ठाकरेंचा पक्ष राज्यात दुसऱ्या क्रमांकाचा राहील. शरद पवारांच्या १० पैकी ८ किंवा ६ जागा जिंकून येतील असं एक्झिट पोलमध्ये समोर आलं आहे", अशा शब्दांत एकनाथ खडसेंनी भाजपाबरोबरच अजित पवार गट व एकनाथ शिंदे गटाला लक्ष्य केलं.महाराष्ट्रातील एक्झिट पोलच्या अंदाजांनुसार महाविकास आघाडी व महायुती यांच्यात काँटे की टक्कर पाहायला मिळेल. त्यात महायुतीनं ४० हून अधिक जागांचे दावे केले होते. अजूनही त्यासंदर्भात चंद्रकांत पाटील यांनी महायुतीला ३८ ते ४१ जागा मिळतील, हा दावा कायम ठेवला आहे.

### काय आहे एक्झिट पोलमध्ये?

त्यामुळे भारतीय जनता पक्षाचं हे अपयश असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे.पण दुसरीकडे महाराष्ट्रात भाजपाप्रणीत महायुतीला मोठा फटका बसण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यावरून राज्यात दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत.भारतीय जनता पक्षाचे नेते चंद्रकांत पाटील, यांनी महाराष्ट्रासंदर्भात एक्झिट पोलचे हे आकडे चुकणार असून ४ जूनला महायुतीलाच जास्त जागा मिळणार असल्याचा दावा केला आहे. पण त्याचवेळी निवडणुकांपूर्वी भाजपामध्ये प्रवेशाचा मानस उघडपणे बोलून दाखवणारे एकनाथ खडसे यांनी भाजपालाच कानपिचक्या दिल्या आहेत.

# अरविंद केजरीवाल यांचं आत्मसमर्पण!

## न्यायालयाने 5 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणामध्ये ईडीने अटक केल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. २१ दिवसांच्या अंतरिम जामीनाची मुदत संपल्यानंतर आज अरविंद केजरीवाल यांनी तिहार तुरुंगात आत्मसमर्पण केलं आहे. तुरुंगामध्ये आत्मसमर्पण केल्यानंतर त्यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



अरविंद केजरीवाल हे अंतरिम जामीनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा जामीनाची मुदत वाढवून मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, मुदत वाढवून मिळण्याच्या जामीन अर्जावर तात्काळ सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला होता. तसंच त्यांच्यावतीने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळण्याची याचिकाही दाखल केली होती. या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवलेला आहे.दरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी आज तुरुंगामध्ये आत्मसमर्पण करण्याआधी दुपारी साडेतीन वाजता सर्वप्रथम राजघाटावर महात्मा गांधींच्या समाधीवर जाऊन आदरांजली वाहिली. त्यानंतर केजरीवाल यांनी कॅनॉट प्लेस येथील हनुमान मंदिरालाही भेट दिली. त्यानंतर आम आदमी पक्षाच्या कार्यालयात दाखल होत पक्षाच्या कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला. यावेळी केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले.कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधताना केजरीवाल म्हणाले, "देश वाचवण्यासाठी मी तुरुंगात जात आहे. मी परत कधी येईल माहीत नाही. तिथे माझे काय होईल? हे मला माहीत नाही. आज मी पुन्हा तिहार तुरुंगात जात आहे. या २१ दिवसांपैकी एक मिनिटही मी वाया घालवला नाही. मी फक्त आम आदमी पक्षासाठी प्रचार केला नाही तर मी मुंबई, हरियाणा, उत्तर प्रदेश, झारखंडमध्येही प्रचार केला. आपल्यासाठी देश महत्वाचा आहे. मी दिल्लीच्या लोकांना सांगू इच्छितो की, मी कोणताही घोटाळा केलेला नाही. मात्र, हुकूमशाही विरुद्ध आवाज उठवला म्हणून तुरुंगात टाकलं", असं केजरीवाल म्हणाले.दिल्लीतील मद्य धोरण प्रकरणात अनियमितता झाल्याचा आरोप केजरीवाल यांच्यावर आहे. त्यांच्याबरोबरच आम आदमी पक्षाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावरही आरोप असून ते गेल्या एक वर्षभरापासून तुरुंगात आहेत. दरम्यान, मद्य परवाना देताना बदल्यात कमिशन स्वरूपात पैसे घेतल्याचा आरोप आहे. तसेच या पैशांचा वापर गोवा विधानसभा निवडणुकीत करण्यात आला असल्याचा आरोप ईडीकडून करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा तपास सध्या सुरू आहे.अरविंद केजरीवाल हे अंतरिम जामीनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा जामीनाची मुदत वाढवून मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, मुदत वाढवून मिळण्याच्या जामीन अर्जावर तात्काळ सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला होता. तसंच त्यांच्यावतीने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळण्याची याचिकाही दाखल केली होती. या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवलेला आहे.दरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी आज तुरुंगामध्ये आत्मसमर्पण करण्याआधी दुपारी साडेतीन वाजता सर्वप्रथम राजघाटावर महात्मा गांधींच्या समाधीवर जाऊन आदरांजली वाहिली. त्यानंतर केजरीवाल यांनी कॅनॉट प्लेस येथील हनुमान मंदिरालाही भेट दिली. त्यानंतर आम आदमी पक्षाच्या कार्यालयात दाखल होत पक्षाच्या कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधला. यावेळी केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले.कार्यकर्त्यांबरोबर संवाद साधताना केजरीवाल म्हणाले.

### अटक झालेलं प्रकरण काय?

अरविंद केजरीवाल हे अंतरिम जामीनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा जामीनाची मुदत वाढवून मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, मुदत वाढवून मिळण्याच्या जामीन अर्जावर तात्काळ सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला होता. तसंच त्यांच्यावतीने दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळण्याची याचिकाही दाखल केली होती. या याचिकेवरील निर्णय राऊस अव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत निर्णय राखून ठेवलेला आहे.दरम्यान, अरविंद केजरीवाल यांनी आज तुरुंगामध्ये आत्मसमर्पण करण्याआधी दुपारी साडेतीन वाजता सर्वप्रथम राजघाटावर महात्मा गांधींच्या समाधीवर जाऊन आदरांजली वाहिली.

# ललित मोदींच्या कुटुंबात संपत्तीवरून कलह

## भावाला बेदम मारहाणीचा आईवरच केला आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

ललित मोदी हे नाव भारतासह जगभरातल्या क्रिकेट विश्वाला परिचयाचं झालं आहे. आयपीएलच्या पहिल्या हंगामात ललित मोदी चर्चेचा विषय ठरले होते. आयपीएलचे माजी चेअरमन ललित मोदी यांच्यावर आर्थिक घोटाळ्याचेही आरोप झाले. त्यातून वाचण्यासाठी त्यांनी विदेशात पलायन केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर ललित मोदी पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.




त्यांच्या कुटुंबात संपत्तीवरून कलह निर्माण झाल्याचं समोर आलं आहे. खुद्द ललित मोदींनीच केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टमध्ये यासंदर्भात पुष्टी करण्यात आली आहे. मोदी कुटुंबातील तब्बल ११ हजार कोटींच्या संपत्तीबाबत हा वाद असल्याचं सांगितलं जात आहे.ललित मोदी यांचे बंधू आणि गॉडफ्रे फिलीपचे संचालक समीर मोदी यांना मारहाण झाल्याची बाब दोन दिवसांपूर्वी समोर आली होती. त्यानंतर खुद्द समीर मोदी यांनीच त्यांच्या आई बिना मोदी यांच्यावर मारहाण करण्यासाठी गुंड पाठवल्याचा आरोप केला. त्यानंतर ललित मोदी यांनी भावाच्या दाव्यांना समर्थन देत आई बिना मोदींचाच या मारहाणीमागे हात असल्याचा दावा केला आहे. तसेच, त्यांनी समीर मोदी यांचे रुग्णालयात प्लॅस्टर लावलेले फोटोही शेअर केले आहेत. बिना मोदी यांनी त्यांच्या सुरक्षारक्षकांकरवी आपल्या भावाला मारहाण केल्याचं ललित मोदींनी म्हटलं आहे.ललित मोदी यांनी शनिवारी संध्याकाळी यासंदर्भातली एक पोस्ट त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी समीर मोदी रुग्णालयात पोस्टर लावलेल्या अवस्थेत असल्याचे फोटोही शेअर केले आहेत. तसेच, समीर मोदी यांना मारहाण झाल्याचं वृत्तपत्रात छापून आलेलं वृत्ती त्यांनी शेअर केलं आहे.माझ्या भावाला या अवस्थेत पाहून मला अतीव दुःख होत आहे. एका आईनं आपल्या सुरक्षारक्षकांकरवी आपल्या एका मुलाला इतक्या बेदमपणे मारहाण करावी की त्याचा हात कायमचा निकामी व्हावा, हे धक्कादायक आहे. त्याची एकच चूक होती. ती म्हणजे त्यानं एका मीटिंगला उपस्थिती लावली. या भयानक गुन्ह्यासाठी कंपनीचे सर्व बोर्ड मेंबर्स दोषी आहेत. माझ्या सहवेदना समीर मोदीसोबत आहेत"मोदींनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

### संपत्तीचा काय आहे वाद?

ललित मोदींनी ही पोस्ट करण्याच्या एक दिवस आधी, अर्थात ३१ मे रोजी समीर मोदींनी दिल्ली पोलिसांकडे आई बिना मोदीविरोधात तक्रार दाखल केली. आपल्या आईनं तिच्या वैयक्तिक सुरक्षा रक्षकांकरवी आपल्याला गंभीर इजा पोहोचवली असल्याचं समीर मोदी यांनी आपल्या तक्रारीत म्हटलं आहे. यात गॉडफ्रे फिलीप्सचे इतर संचालकही सहभागी असल्याचं त्यांनी तक्रारीत नमूद केलं आहे. कंपनीच्या जसाला येथील कार्यालयात कंपनीच्या नियोजित बैठकीसाठी जाण्याचा प्रयत्न केला असता ही मारहाण करण्याच आल्याचा दावा तक्रारीत केला आहे.एका मुलाला इतक्या बेदमपणे मारहाण करावी की त्याचा हात कायमचा निकामी व्हावा.

# शाहरुखचे जंगी स्वागत



बुधवारी चेन्नईमध्ये जवानचा भव्य म्युझिक लॉंच कार्यक्रम पार पडला. शाहरुख खान, विजय सेतुपती, संगीतकार अनिरुद्ध आणि दिग्दर्शक ॲटली कुमार यांच्यासह चित्रपटाशी संबंधित अनेक जण तेथे पोहोचले. या कार्यक्रमात शाहरुख खानचे भव्य स्वागत करण्यात आले. हा कार्यक्रम स्थानिक महाविद्यालयात ठेवण्यात आला होता. हजारो चाहते तेथे पोहोचले होते. हा कार्यक्रम 7 सप्टेंबरला चित्रपट प्रदर्शित होण्याच्या एक आठवड्यापूर्वी आयोजित करण्यात आला होता. हिंदुस्तान टाइम्सच्या रिपोर्टनुसार, म्युझिक लॉन्च इव्हेंटमध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक ॲटली म्हणाले की, एकेकाळी ते मुंबईत शाहरुखच्या मन्नत या घराबाहेर शूटिंग करत होते. हा प्रकार त्याच्या मित्राला कळताच त्याने मन्नतसमोर उभे राहून फोटो काढण्यास सांगितले. ॲटली सांगतात की, या घटनेच्या 13 वर्षांनंतर स्वत: शाहरुख खानने त्यांच्यासाठी मन्नतचे गेट उघडले आहे. 'जवान'मध्ये खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता विजय सेतुपतीही या कार्यक्रमाला उपस्थित होता. तो म्हणाला- कॉलेजमध्ये माझे एका मुलीवर प्रेम होते. तिला शाहरुख खान खूप आवडायचा. आता शाहरुखकडून याचा बदला घेण्याची संधी मला मिळाली आहे. शाहरुखने विनोदाने उत्तर दिले - तू माझ्याकडून बदला घेशील, पण तू माझ्याकडून मुली हिसकावून घेऊ शकत नाहीस. चित्रपटाचे कला दिग्दर्शक मुत्थुराज म्हणाले- शाहरुख खानने जवानच्या माध्यमातून 3000 कुटुंबांना रोजगार दिला आहे. त्यांना हवे असते तर त्यांना मुंबईत सहज सेट करता आले असते. ते चेन्नईला आले. त्या सर्व कुटुंबीयांच्या वतीने मला शाहरुखचे आभार मानायचे आहेत. शाहरुख खान आज (31 ऑगस्ट) बुर्ज खलिफा येथे चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करणार आहे. याबाबतची माहिती शाहरुखने सोशल मीडियावर आधीच दिली होती.

# राधिका पहिल्यांदाच नेपोटिझमवर बोलली!



अभिनेत्री राधिका आपटे हिची वेगळी ओळख सांगायची गरज नाही. तिने तिच्या अभिनय कौशल्यानं मनोरंजन विश्वात वेगळीच ओळख निर्माण केली आहे. राधिका आपटे कायमच चर्चेत असते. राधिका ही नेहमी नवनवीन भूमिका, धाडसी प्रयोग आणि तिच्या बोल्ड अभिनयासाठी ओळखली जाते. अभिनेत्री राधिका आपटेचे अनेकदा तिच्या निःपक्षपाती मतांसाठी कौतुक केले जाते. कामांबरोबरच ती तिच्या वक्तव्यामुळे देखील चर्चेत असते. ती प्रचंड स्पष्टव्यक्ती आहे. ती कोणत्याही मुद्यावर तिचं स्पष्ट मत व्यक्त करत असते. आता राधिकाने नुकतिच एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत तिने नेपोटिझमबद्दल आणि चित्रपट निर्मात्यांबद्दल काही स्पष्ट मत सांगितलं.यावर राधिका म्हणाली की, ज्या अभिनेत्यांना चांगलं काम करायचं आहे, त्यांना सगळ्यात आधी व्यायाम करून शरीर तयार करावं लागतं. यानंतर, त्यांना चांगले कपडे घालण्यापासून ते पापाराझी कॅमेऱ्यात येण्यापर्यंत सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल." पुढे ती म्हणते की, "मात्र स्टार किड्स कोणताही कोर्स किंवा कोचिंग करत नाहीत, कारण त्यांच्यासाठी ते महत्त्वाचे नसते. त्यांना वाटतं की आपण स्टार किड्स आहोत, आपल्याला सर्व काही येतं." "तर दुसरीकडे तो स्टार किड आहे, तो अभिनय करणारचं. जर नसेल करता येत तर आपण करुन घेवू असं चित्रपट निर्मात्यांनाही वाटतं. मला निर्मात्यांचे हे दोन चेहरे पाहिल्यानंतर खुप राग येतो. एकीकडे तुम्ही म्हणता की तुम्ही अभिनय करवून घेणार हा विश्वास तुम्हाला असतो मात्र जेव्हा चित्रपट फ्लॉप होतो तेव्हा तुम्ही कलाकाराला दोषी ठरवतात. वर्क फ्रंटवर बद्दल बोलायचं झालं तर, राधिकाने अनेक प्रकारच्या चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. राधिकाने आजवर 'बदलापूर', 'हंटर', 'पॅड मॅन', 'पारचड', 'लस्ट स्टोरीज', 'माझी' यासारखे अनेक दर्जेदार चित्रपट केले आहेत. काही दिवसांपूर्वी ती अनुश्री मेहताच्या स्पाय कॉमेडी मिसेस अंडरकव्हरमध्ये दिसली होती. त्यानंतर ती मेड इन हेवनच्या दुसऱ्या सिझनमध्ये दिसली. आता ती मर्डर मिस्ट्री चित्रपटात दिसणार आहे

# कोकण हार्टेड गर्ल मनसेत?

कलाकारांचा राजकारणाकडे कल वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून अनेक मराठी कलाकरांनी राजकीय पक्षात प्रवेश केला आहे. त्यात कालच अभिनेता अभिजीत केळकर याने देखील भाजपात प्रवेश केला. आता त्यातच आणखी एका कलाकाराने राजकारणात येण्याबद्दल हिंट दिली आहे. ती कलाकार म्हणजे अंकिता वालावलकर अंकिता वालावलकर ही कोकण हार्टेड गर्ल म्हणून प्रसिद्ध आहे. अंकिताचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत असतात. अंकिता यु ट्यूबवर सुद्धा सक्रिय असते. अंकिताचे व्हिडिओ चाहत्यांच्या पसंतीस उतरत असतात.

तिने केवळ रील स्टार म्हणून लोकप्रियता मिळवलेली नाही तर तिने तिच्या बऱ्याच व्हिडिओतून सामाजासाठी काही तरी करण्याचा प्रयत्न देखील करत असते. तिचे असे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात.अशातच आता अंकिता देखील राजकारणात येण्याचा विचार करतेय असं तिच्या वक्तव्यावरुन दिसतयं. अंकिता वालावलकरने नुकतीच सकाळला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिच्या राजकारणातील एंट्री बद्दल प्रश्न विचारण्यात आला होता.

त्यावेळी तिने दिलेल्या उत्तराने सर्वांचे लक्ष वेधले आहे. ती म्हणाली, "पहिल्यापासून राजकारणातलं एक व्यक्तिमत्व म्हणजे बाळासाहेब ठाकरे मला फार आवडायचे. त्यानंतर राज ठाकरे हे व्यक्तीमत्व आवडायचं कल असं नाही म्हणता येणार पण आपल्याला कळत ना कोण चांगलं काम करत आणि स्पष्ट बोलतयं मी पहिल्यांदा त्यांच्या घरी गेले त्यामुळे त्यांच्या पक्षाशी जास्त संबंध आला.

# मलायका अरोराने सोडलं मौन!



मलायका अरोरा आणि अर्जुन कपूरच्या ब्रेकअपची चर्चा सुरू असतानाच अभिनेत्रीच्या टीमने याबाबत मोठी अपडेट दिली आहे. गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेलं हे नात संपुष्टात आलं असल्याची अफवा सगळीकडे पसरली होती. आता मलायका अरोराच्या मॅनेजरने याबद्दल खुलासा केला आहे. पिंकविलाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या अनेक सूत्रांनी असं सांगितलं होतं की, या जोडप्यानं आता वेगळं होण्याचा निर्णय घेतलाय.

# सुपरस्टार नयनतारानं केला मोठा धमाका!

साऊथची सुपरस्टार नयनतारा ही सध्या किंग खानच्या जवान चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. त्यात ती महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. यामध्ये नयनतारानं एका महिला पोलीस अधिकाऱ्याची व्यक्तिरेखा साकारली आहे. पठाणनंतर जवान हा शाहरुखचा एक महत्वकांक्षी प्रोजेक्ट असल्याचे सांगितले जाते. आज जवानचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्याला नेटकऱ्यांचा, चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. अवघ्या काही तासांत तीस लाखांहून अधिक व्ह्यूज या ट्रेलरला मिळाले आहे. यात वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर जवान हा ट्रेंडिंगचा विषय असल्याचे दिसून आले आहे. त्यात विजय सेतुपति, प्रियामणि, सान्या मल्होत्रा, गिरीजा ओक आणि सुनील ग्रोव्हर यांच्या भूमिका आहे. त्यात नयनताराच्या भूमिकेविषयी वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. ती पहिल्यांदाच शाहरुखसोबत दिसणार आहे. गेल्या काही दिवसांपासून टॉलीवूड विरुद्ध बॉलीवूड असा संघर्ष दिसून येत असून त्यात टॉलीवूडची सरशी झाली आहे. मात्र या वर्षाच्या सुरुवातीला शाहरुखचा जवान रिलिज झाला आणि त्यानं टॉलीवूडला जोरदार टक्कर दिल्याचे दिसून आले आहे. पठाणनं तर देशभरातून एक हजार कोटींची विक्रमी कमाई केली होती. त्यामुळे आता जवानकडून देखील नेटकरी मोठी अपेक्षा करत असल्याचे दिसून येत आहे. त्यात शाहरुखसोबत दीपिका, आलिया आणि नयनतारा ट्रेंडिंगचा विषय आहे. यासगळ्यात नयनतारा पहिल्यांदाच इंस्टावर ॲक्टिव्ह झाल्यानं ती चर्चेचा टॉपिक आहे.

# अमेरिकेने रचला इतिहास!

## अमेरिकेच्या फलंदाजांकडून कॅनडाच्या गोलंदाजांची धुलाई

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. पहिला सामना यजमान अमेरिका आणि कॅनडा यांच्यात खेळला गेला. या सामन्यात अमेरिकेने ७ विकेट्सनी कॅनडावर मात करत ऐतिहासिक विजय नोंदवला. या सामन्यात अमेरिकेने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात मोठे धावांचे आव्हान अवघ्या १७.४ षटकात पूर्ण केले. टी-२० विश्वचषकात अमेरिकेचा हा पहिला विजय आहे. हा ऐतिहासिक विजय चाहते विसरू शकणार नाहीत. या सामन्यात स्फोटक फलंदाजीचे प्रदर्शन करणारा ॲरॉन जोन्स अमेरिकेच्या विजयाचा हिरो ठरला.**



कॅनडातील डॅलस येथील ग्रँड प्रेरी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात अमेरिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो पूर्णपणे त्यांच्या बाजूने गेला. कॅनडाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ गडी गमावून १९४ धावा केल्या. नवनीत धालीवालने संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने ४४ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६१ धावा केल्या. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या अमेरिकेने १७.४ षटकांत विजय नोंदवला. अमेरिकेच्या फलंदाजांसमोर कॅनडाचे गोलंदाज पूर्णपणे असहाय्य दिसत होते.ॲरॉन जोन्सने अमेरिकेसाठी सर्वात मोठी खेळी खेळली, त्याने ४० चेंडूत ४ चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने ९४* धावा केल्या. याशिवाय अँड्रिज गसने ४६ चेंडूंत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६५ धावा केल्या.१९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकेची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर स्टीव्हन टेलरच्या रूपाने संघाने पहिली विकेट गमावली, जो खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर कर्णधार मोनांक पटेल आणि अँड्रिज गस यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची (३७ चेंडू) भागीदारी केली. ही भागीदारी १८व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर कर्णधार पटेलच्या विकेटने संपुष्टात आली. मोनांकने १६ चेंडूत २ चौकारांच्या मदतीने १६ धावांची खेळी साकारली.यानंतर अँड्रिज गूस आणि ॲरॉन जोन्स यांनी तिसऱ्या विकेटसाठी १३१ धावांची (५८ चेंडू) जलद भागीदारी केली. या भागीदारीमुळे स्पर्धा अमेरिकेच्या बाजूने गेली. या भागीदारीनंतर हा सामना अमेरिकेसाठी एकतर्फी ठरली. ही शानदार भागीदारी १६व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर अँड्रिज गसच्या विकेटने संपुष्टात आली. अँड्रिजने ४६ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६५ धावांची खेळी केली. यानंतर कोरी अँडरसन आणि ॲरॉन जोन्स यांनी चौथ्या विकेटसाठी २४ (१२ चेंडू) धावांची नाबाद भागीदारी करून अमेरिकेला विजय मिळवून दिला. जोन्सने नाबाद ९४ धावा केल्या, तर अँडरसन ५ चेंडूत धावा केल्यानंतर नाबाद राहिला.अमेरिकेच्या फलंदाजांनी कॅनडाच्या गोलंदाजांची धुलाई केली. कॅनडाकडून कलीम सना, डिलन हेलिगर आणि निखिल दत्ता यांनी प्रत्येकी १ विकेट्स घेतली. निखिल दत्ता संघासाठी सर्वात महागडा ठरला, त्याने २.४ षटकात १५.४० च्या इकॉनॉमीमध्ये ४१ धावा दिल्या.

### ॲरॉन जोन्स विजयाचा हिरो ठरला


जेरेमी गॉर्डनने १४.७० च्या इकॉनॉमीमध्ये ३ षटकात ४४ धावा दिल्या आणि कर्णधार साद बिन जफरने ४ षटकात १०.५० च्या इकॉनॉमीमध्ये ४२ धावा दिल्या.आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. पहिला सामना यजमान अमेरिका आणि कॅनडा यांच्यात खेळला गेला. या सामन्यात अमेरिकेने ७ विकेट्सनी कॅनडावर मात करत ऐतिहासिक विजय नोंदवला. या सामन्यात अमेरिकेने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात मोठे धावांचे आव्हान अवघ्या १७.४ षटकात पूर्ण केले. टी-२० विश्वचषकात अमेरिकेचा हा पहिला विजय आहे. हा ऐतिहासिक विजय चाहते विसरू शकणार नाहीत. या सामन्यात स्फोटक फलंदाजीचे प्रदर्शन करणारा ॲरॉन जोन्स अमेरिकेच्या विजयाचा हिरो ठरला.

# रोहितला भेटण्यासाठी फॅन पोहोचला मैदानात

## सुरक्षारक्षकाने पकडल्यानंतर हिटमॅनची रिॲक्शन व्हायरल

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० विश्वचषक २०२४ चा सराव सामना न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशचा ६० धावांनी पराभव केला.स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यादरम्यान एका चाहत्याने सुरक्षा तोडली आणि थेट टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माला भेटण्यासाठी मैदानाच्या मध्यभागी गेला. त्यानंतर अमेरिकन पोलिसांनी चाहत्याच्या मानेला पकडून त्याचा चेहरा जमिनीवर टेकवला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.**



टीम इंडिया क्षेत्ररक्षणासाठी मैदानात हजर असताना एका व्यक्तीने सुरक्षा चकवा देत थेट मैदानात प्रवेश केला. या चाहत्याचा 'हिटमॅन' रोहित शर्माला मिठी मारणे उद्देश होता. हा चाहता वेगाने धावत टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मापर्यंत पोहोचला आणि त्याला मिठी मारली. यानंतर अमेरिकन पोलिसांनी या व्यक्तीला क्रूरपणे पकडून त्याची मान पकडली. अमेरिकन पोलिसांनी रोहित शर्मासमोर त्या चाहत्याला हातकडी लावली. यानंतर अमेरिकन पोलिसांनी त्या चाहत्याचे तोंड जमिनीवर दाबले. जेव्हा यूएस पोलिस या चाहत्याला क्रूरपणे पकडताना दिसले, त्यावेळी टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा पोलिसांना चाहत्यासोबत थोडी नम्रता दाखवण्याची विनंती करताना दिसला. रोहित शर्माच्या या कृतीने सर्वांची मनं जिंकली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सामन्याबद्दल बोलायचे झाले तर भारतीय संघाने बांगलादेशचा ६० धावांनी पराभव केला. टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याने या सामन्यात दमदार फलंदाजी करताना २३ चेंडूत ४० धावा केल्या.

### सहावा गोलंदाज म्हणून हार्दिक

टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेला आजपासून वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या भूमीवर सुरूवात होत आहे. भारतीय संघाला टी-२० विश्वचषक २०२४ मधील आपला पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडविरुद्ध खेळायचा आहे. ९ जून रोजी भारताचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. पाकिस्तानचा सामना केल्यानंतर दोन दिवसांनी म्हणजेच १२ जूनला भारताचा सामना अमेरिकेशी होणार आहे. हे तिन्ही सामने न्यूयॉर्कमध्ये होणार आहेत. यानंतर टीम इंडिया १५ जूनला कॅनडाचा सामना करण्यासाठी लॉडरहिलला रवाना होईल. भारताचे सर्व सामने भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होतील. भारत आणि बांगलादेश यांच्यातील टी-२० विश्वचषक २०२४ चा सराव सामना न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला.स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यादरम्यान एका चाहत्याने सुरक्षा तोडली आणि थेट टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माला भेटण्यासाठी मैदानाच्या मध्यभागी गेला.